# महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र राज्य लॉटरी

## वित्त विभाग

## मंत्रालय, मुंबई.

## नागरिकांची सनद

# नागरिकांची (सनद)

# महाराष्ट्र राज्य लॉटरी

दिनांक १ मे,१९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्याकाळी राज्यात अनधिकृतरित्या चालणा-या मटका व्यवसायामुळे महाराष्ट्रातील तरुण पिढी बरबाद होऊ लागली होती . त्यास आळा बसावा व राज्यास महसूल मिळावा या हेतूने महाराष्ट्र शासनाने स्वतःची लॉटरी सुरु करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार जुलै,१९६९ पासून महाराष्ट्र शासनाची पारंपारिक पध्दतीची लॉटरी सुरु करण्यात आली . तद्नंतर भारतात संगणक प्रणालीचा वापर सुरु झाल्यानंतर त्याचा लॉटरी व्यवसायातही वापर सुरु झाला . त्यामुळे या व्यवसायातील वाढलेल्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सन २००० मध्ये महाराष्ट्र शासनाने संगणकावर चालणारी स्वतःची दोन अंकी (इंटरनेट माध्यमातील) पेपर लॉटरी तसेच ऑनलाईन लॉटरी सुरु करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र राज्य संचलीत लॉटरी व्यवसायाचे नियमन करण्याच्या उद्देशाने शासनाने वित्त विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाची स्थापना केली. व त्यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य लॉटरीबाबतची सर्व कार्ये करण्यात येतात.

**आमचे ध्येय :-**

- परराज्यातील लॉट-यांनी राज्य लॉटरीला निर्माण केलेल्या तीव्र स्पर्धा तसेच इतर राज्यांच्या लॉट-यांची महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तुलनेत होत असलेली प्रचंड उलाढाल लक्षात घेता महाराष्ट्र राज्य लॉटरीची विक्री वाढविण्याच्या दृष्टीने सुयोग्य लॉट-या सुरु करणे व त्याच्या बरोबरीने पारंपारिक लॉट-याही चालू ठेवणे व त्यापासून शासनाच्या उत्पन्नात वाढ करणे.
- लॉटरीद्वारे मिळालेले उत्पन्न राज्याच्या विविध विकासात्मक योजनांसाठी उपलब्ध करुन देणे.
- लॉटरीद्वारे राज्यातील बेरोजगारांना थोडयाफार प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणे.

**आमची वचनबध्दता :-**

- केंद्र शासनाच्या लॉटरी (विनियमन) अधिनियम १९९८ मधील कलम ४ मधील तरतुदीनुसार खालील बाबींच्या अधीन राहून राज्य लॉटरी योजना राबविणे--

(१) पूर्व घोषित किंवा एक अंकी लॉटरी तिकीटांवर बक्षिसे अदा करण्यात येत नाहीत,

(२) राज्य लॉटरीची तिकीट छपाई करताना लॉटरी तिकीटावर महाराष्ट्र राज्य लॉटरीचा **"सोर्डेत माळ घेतलेला हत्ती"**, हे बोधचिन्ह असलेले लॉटरी तिकीटच छापण्यात येईल, जेणेकरुन जनतेला महाराष्ट्र राज्याच्या लॉटरी तिकीटांबाबतंची विश्वसनीयता वाटू शकेल.

(३) पारंपारिक तसेच नव्याने सुरु करण्यात येणा-या सुयोग्य राज्य लॉटरीची तिकीटे अधिकृत अभिकर्त्यामार्फत , अधिकृत ठोक अभिकर्त्यामर्फत (बल्क एजंटामार्फत ) विकण्यात येतील.

(४) राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रीपासून प्राप्त झालेले उत्पन्न शासनाच्या लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

(५) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडती या स्वतः राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात येतील.

(६) मागणी न केलेल्या बक्षिसपात्र तिकीटांची रक्कम शासनाच्या लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

(७) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडतींचे ठिकाण राज्यांतंर्गत असेल,

(८) महाराष्ट्र राज्य लॉटरीची कोणतीही सोडत आठवडयातून एकदाच असेल,

(९) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या सोडतींचे आयोजन राज्य शासनाने निश्चित केलेल्या विहित वेळेत करण्यात येईल,

(१०) महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या भव्यतम सोडती वर्षातून जास्तीत जास्त ६ काढण्यात येतील,

(११) या व्यतिरिक्त केंद्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

- केंद्र शासनाच्या लॉटरी (विनियमन) १९९८ मधील तरतुदीनुसार राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या पांरपारिक साप्ताहिक, मासिक व भव्यतम सोडती आयोजित करणे. तसेच

संगणकावर चालणा-या ऑनलाईन व इंटरनेट माध्यमातील दोन अंकी पेपर लॉटरीचे आयोजन व सनियंत्रण करणे.

**आमची जबाबदारीः-**

- महाराष्ट्र राज्य लॉटरी योजनेचा प्रचार व प्रसार करणे.
- महाराष्ट राज्य लॉटरीची तिकीट विक्री सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकृत अभिकर्त्यांची नियुक्ती करणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरी तिकीटांची उचल विहित प्रमाणात करण्यासाठी अधिकृत अभिकर्त्यांवर जबाबदारी निश्चित करणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरी अधिकाधिक आकर्षक व लोकाभिमुख होण्यासाठी त्या लॉटरीच्या सोडतींची बक्षिस रचना अधिकाधिक आकर्षक व लोकाभिमुख करण्यासाठी त्या लॉटरी सोडतीच्या बक्षिस रचना अधिकाधिक आकर्षक करण्यासारख्या उपाययोजना करणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या योजनांच्या सोडतीचे विहित कालावधीत व वेळेत आयोजन करणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडतींची लॉटरी तिकीटे अधिकृत लॉटरी अभिकर्त्यापर्यन्त विहित मुदतीत पाठविणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या सोडतींचे निकाल त्याच दिवशी राज्यातील सर्व जिल्हा क्षेत्रिय कार्यालये, माहिती व जनसंपर्क कार्यालय, मुंबई यांच्याकडे पाठविणे. तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे.
- महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या ंपारंपारिक लॉट-याच्या / नवीन योजनेत तिकीट सादर केल्याच्या दिनांकापासून अंदाजे ४५ दिवसात बक्षिसपात्र तिकीटांच्या रक्कमेचे प्रदान करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतात.
- महाराष्ट्र राज्य लॉटरीची तिकीट विक्री सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच १००% विक्री होण्यासाठी लॉटरी कार्यालयाकडून अधिकृत ठोक अभिकर्त्याची नियुक्ती करणे.

- महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या संगणकावर चालणा-या ऑनलाईन तसेच दोन अंकी इंटरनेट माध्यमातील पेपर लॉट-या संपूर्णपणे पारदर्शीपणाने चालविणे त्यासाठी आवश्यक नियम तयार करणे तसेच या लॉट-यांच्या सिस्टीम ऑडीटसाठी सिस्टीम ऑडीटरची नियुक्ती करणे. जेणेकरुन या लॉट-या चालविताना कुणासही गैरप्रकार करण्यास वाव मिळणार नाही.

केंद्र शासनाच्या लॉटरी (रेग्युलेशन) अॅक्ट १९९८ मधील तरतुदींनुसार स्वतःची लॉटरी चालविण्यासाठी शासनाने अनुक्रमे महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम २०००, भाग-एक व महाराष्ट्र राज्य ऑनलाईन लॉटरी नियम २००१ तयार केले आहे. व त्याआधारे राज्य लॉटरीतील सर्व कामकाज पार पाडण्यासाठी आयुक्त,अल्पबचत व राज्य लॉटरी यांच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाची स्थापना केली आहे. तसेच जून २००४ पासून कोषागामार्फत करण्यात येणारी राज्य लॉटरीच्या पारंपारिक तिकीटांची विक्री बंद करुन सर्व तिकीटांची विक्री करण्याचे काम तसेच महाराष्ट्र शासन संचालित व इंटरनेट माध्यमातील दोन अंकी लॉटरी व ऑनलाईन लॉटरी संदर्भातील अंमलबजावणीचे सर्व कामे पार पाडण्यासाठी उपसंचालक (वि.व ले.) यांच्या नियंत्रणाखाली एका कक्षाची स्थापना केली असून तो कक्ष शिवडी येथे कार्यरत आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाचे काम उपसंचालक, राज्य लॉटरी तथा अवर सचिव, वित्त विभाग यांच्यामार्फत हाताळले जाते. त्यासाठी तीन कार्यासने व एक रोख शाखा कार्यरत असून त्यांचे कामकाज संबंधित कार्यासन अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी तसेच लेखाधिकारी यांचेकडून पाहिले जाते. संबंधित कार्यासनाकडून हाताळण्यात येणा-या विषयांची सूची खालीलप्रमाणे.

**उपसंचालक व अवर सचिव :-**

१. सर्व कर्मचारीवर्गावर पर्यवेक्षण करणे.

२. रु.२५,०००/- पर्यन्तच्या सर्व सोडतींच्या बक्षिसपात्र तिकीटांची देयके मंजूर करणे.

३. लॉटरी योजनांच्या विकासाबाबत अभ्यास करुन संचालकाना योग्य ती माहिती पुरविणे व त्यांच्या कामात त्यांना मदत करणे.

४.	लॉटरी सोडतींच्या कामावर देखरेख ठेवणे व त्यांचे संचलन करणे.

५.	बाजापेठेचा अंदाज घेऊन लॉटरी योजनांची बक्षिस रचना सादर करणे.

**रोखशाखा :-**

१.	लेखा, अर्थसंकल्प, ताळमेळ आणि लॉटरीच्या हिशेबाची अद्ययावत माहिती व आकडेवारी ठेवणे.

२	लेखापरीक्षा परिच्छेद व विनियोजन लेखे विषयक कामे हाताळणे.

३	आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे रोख रकमांवर नियंत्रण ठेवणे.

४	खर्चाच्या नोंदवहया अद्ययावत ठेवून मंजूर करण्यात आलेल्या अनुदानावर व खर्चावर नियंत्रण ठेवणे.

५	रोकड  वही व रोख रकमा यांची तपासणी करणे.

६	रोख शाखेशी सर्व कामे हाताळणे.

७	न विकलेल्या तिकीटांची माहिती अद्ययावत ठेवणे.

**कार्यासन लॉटरी-१:-**

१.	महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडतींच्या रु.५,०००/- वरील बक्षिसांच्या तसेच छिन्नविछिन्न फाटलेल्या अथवा इतर कोणत्याही कारणाने खराब झालेले तिकीटांच्या बक्षिसाच्या मागण्यांची व मुदतबाहय बक्षिसपात्र तिकीटांच्या मागण्यांची छाननी करणे.  हया संदर्भात शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, अधिदान व लेखा कार्यालय / सर्व कोषागार कार्यालये यांचेशी संपर्क ठेवणे.

२.	बोनस मागण्या.

३.	न विकलेल्या तिकीटांच्या कामात लेखा अधिकारी यांना मदत करणे.

४.	बनावट बक्षिसपात्र तिकीटांबाबत कोर्ट केसेस हाताळणे.

**कार्यासन लॉटरी २ :-**

१.	लॉटरी तिकीटांची छपाई करण्याबाबतचे सर्व काम.  तसेच ही तिकीटे विक्रीसाठी शिवडी कार्यालयास उपलब्ध करुन देणे.

२.	रेल्वे पार्सलसाठी रेल्वेच्या दादर, व्ही.टी., कुर्ला कार्यालयाशी संपर्क ठेवणे.

३.	मुंबई व जिल्हयांचे ठिकाणी सर्व सोडतींची व्यवस्था पाहणे/उपसंचालकांना संचलनाचे वेळी मदत करणे.

४. लॉटरी सोडतींचा प्रत्येक महिन्याचा कार्यक्रम आखून तिकीटांचे डिझाईन / प्रपत्र तयार करणे.

५. कार्यालयाच्या वाहनांची देखभाल व दुरुस्ती.

६. शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातून लेखानसामुग्री पुरवठा मिळविणे. दोन अकी व पारंपारिक साप्ताहिक (३ अंकी) लॉटरी तिकीटांची छपाई करुन घेणे व डिझाईन इत्यादी बाबी ठरविणे.

**<u>कार्यासन लॉटरी-३:-</u>**

१. महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय व शिवडी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी.

२. उपसंचालकांना सर्वसाधारण सहाय्य करणे.

३. आस्थापना विषयक प्रकरणे हाताळणे / त्या संदर्भात वित्त विभागाशी संपर्क ठेवणे.

४. मुंबईतील लॉटरी अभिकर्त्याची नियुक्ती करणे व राज्यातील सर्व लॉटरी अभिकर्त्याच्या/तसेच अभ्यागतांच्या तक्रारी निवारण करणे.

५. विधानसभा / विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा प्रश्नविषयक प्रकरणे हाताळणे.

६. राज्य लॉटरी मंडळ, जिल्हा लॉटरी अधिकारी, लॉटरी अभिकर्ते यांच्या बैठकी आयोजित करणे.

७. अनधिकृत लॉटरीसंबंधी आवश्यक ती कार्यवाही करणे.

तसेच वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक लॉटरी तिकीटांची विक्री करण्याबाबतची सर्व कामे व महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या इंटरनेट माध्यमातील दोन अंकी पेपर लॉटरी तसेच ऑनलाईन लॉटरीच्या अंमलबजावणी सबंधीची कामे उपसंचालक (वित्त व लेखा), शिवडी यांच्याकडून हाताळली जातात. त्यासाठी त्या कक्षाच्या कामाची सूची खालीलप्रमाणे आहेः-

१) २ अंकी व पारंपारिक साप्ताहिक (३ अंकी) लॉटरी योजनाची मुद्रणालयाकडून आलेली तिकीटे स्विकारणे.

२) *२ अंकी* व पारंपारिक साप्ताहिक (३ अंकी) तिकीटांची विक्री व त्यासंबंधीची कामे.

३) पारंपारिक साप्ताहिक, मासिक व भव्यतम सोडतीच्या रु.५,०००/- पर्यन्त रक्कमेच्या बक्षिसपात्र तिकीटांचे प्रदान करणे, बोनस व २% सेवाआकार प्रदान करणे.

४) २ अंकी व पारंपारिक साप्ताहिक (३ अंकी) लॉटरी योजनांच्या विक्री न झालेल्या तिकीटांचा अहवाल तयार करणे.

५) २ अंकी व पारंपारिक साप्ताहिक (३ अंकी) लॉट-यांच्या विक्री न झालेल्या तिकीटांचा आयुक्त, राज्य लॉटरी यांची पूर्व मान्यता घेऊन त्या संदर्भात अहवाल सादर करणे व विल्हेवाट लावणे.

६) मासिक जमा-खर्चाच्या रकमा संचालनालयास कळविणे.

७) संचालनालयाच्या सहमतीने प्रदानित तिकीटांचे आवश्यक ते लेखा परिक्षण झाल्यानंतर विल्हेवाट लावणे.

८) लॉटरीवरील कर / लायसन्स फी जमा करणे व अंमलबजावणी करणे.

९) दोन अंकी लॉट-यांच्या सोडती घेणे.

१०) दोन अंकी लॉट-यांचे निकाल वृत्तपत्रात प्रसिध्द करणे.

११)शिवडी लॉटरी कार्यालयाचे अंतर्गत लेखा परिक्षण करणे.

१२)शिवडी लॉटरी कार्यालयाचे महालेखापाल कार्यालयाकडून कंकरट ऑडीट करुन घेणे.

१३)बँक हमी (ऑनलाईन लॉटरी योजना इ.) जमा करणे, वेळोवेळी नुतनीकरण करुन घेणे इत्यादी.

१४) शिवडी कार्यालयाचे संगणकीकरण करुन घेणे/वेबसाईटची अंमलबजावणी करणे.

१५)

१६)वेबसाईटची अंमलबजावणी.

१७) सर्व प्रकारच्या निविदांचे (२ अंकी व ऑनलाईन लॉटरीसाठी सिस्टिम ऑडिटर इत्यादी प्रस्तावाबाबत) मसुदे तयार करणे.

१८) धोरणात्मक प्रस्ताव/मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठीचे प्रस्ताव तपासणे.

१९) अंकी लॉटरीसाठी ठोक अभिकर्ते व ऑनलाईन लॉटरी अभिकर्त्याची नियुक्ती वगैरे करिता निविदा पत्र तयार करणे.

तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय व उपसंचालक (वि.व ले.) शिवडी यांच्या कार्यालयातील सहाय्यक माहिती अधिकारी, व अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे :-

**महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाची माहिती.**

| अ.क्र. | पदनाम | माहितीच्या कायद्यानुसार हुद्दा | कार्यालयातील दूरध्वनी व ई-मेल आय.डी. | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | उपसंचालक, राज्य लॉटरी, | अपिलीय अधिकारी | ०२२-२२०२९२७३/ ०२२-२२८७६१३८ | संपूर्ण महाराष्ट्र |
| २ | राज्य लॉटरी अधिकारी, लॉ-१ | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ३ | राज्य लॉटरी अधिकारी,लॉ.२ व लॉ.३ | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ४ | लेखा अधिकारी (रोख शाखा) | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ५ | सहाय्यक, लॉटरी-१ | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ६ | सहाय्यक, लॉटरी-२ | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ७ | सहाय्यक, लॉटरी-३ | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२९२७३ | संपूर्ण महाराष्ट्र |

**उपसंचालक (वित्त व लेखा) म.रा.लॉ.शिवडी यांचे कार्यालयातील अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी याबाबतची माहिती.**

| अ.क्र. | पदनाम | माहितीच्या कायद्यानुसार हुद्दा | कार्यालयातील दूरध्वनी व ई-मेल आय.डी. | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | उपसंचालक (वि.व ले), शिवडी कार्यालय | अपिलीय अधिकारी | ०२२-२३५०१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| २ | लेखा अधिकारी (प्रशासन शाखा) | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३५०१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ३ | लेखा अधिकारी (लेखा शाखा) | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३५०१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी (लेखा शाखा) | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३५०१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ५ | सहाय्यक लेखा अधिकारी (प्रशासन) | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३५०१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय. |

**आमची सेवा :-**

- महाराष्ट्र राज्य लॉटरी योजनांचा प्रचार व प्रसार करणे.
- अधिकृत लॉटरी अभिकर्त्यांना सर्व सोडतींचे निकाल त्वरित उपलब्ध करुन देणे.
- सर्व अधिकृत अभिकर्त्याकडून प्राप्त झालेल्या बक्षिसपात्र तिकीटांच्या रकमा प्रदान करणे, व बोनस आणि सेवाआकार देणे.

- सर्व अधिकृत लॉटरी अभिकर्त्याच्या वेळोवेळी उद्‌भवणा-या समस्यांचे निराकरण करणे.
- राज्य लॉटरीचे महत्व सर्वसामान्य जनतेला पटण्यासाठी सर्व भव्यतम सोडतीचे योग्यप्रकारे आयोजन करणे आणि सोडतींची योग्यप्रकारे विविध माध्यमातून प्रसिध्दी करणे.

**<u>आमची अपेक्षा :-</u>**

- करारपत्रानुसार सर्व अधिकृत विक्रेत्यांना दर सोडतीमागे आश्वासित रक्कम शासनाला देणे बंधनकारक आहे.
- निकाल प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात विजेत्याला रु.५,०००/- पर्यन्तचे बक्षिस अभिकर्ता त्वरित देईल व त्याची प्रतिपूर्ती अभिकर्त्याने १२० दिवसात शासनाकडून करुन घेणे आवश्यक राहील.
- रु.५,०००/- वरील बक्षिसपात्र तिकीट विजेत्याने त्या बक्षिसाची मागणी ६० दिवसाच्या आत शासनाकडे सादर करुन बक्षिसाची रक्कम मिळणेबाबत मागणी करणे जरुरीचे असेल.
- सर्व अधिकृत लॉटरी अभिकर्त्यानी राज्य लॉटरीची तिकीट विक्री जास्तीत जास्त करणे व त्यासाठी सर्वसामान्य जनतेला आणि ग्राहकांना अधिकाधिक तिकीट विक्रीसाठी प्रोत्साहित करणे.